# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 167 नाग/2011

सौ. ज्योती वसंतराव पाठक
धरमपेठ महिला बॅंकेसमोर, वॉकररोड, महाल, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अशोक पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
गांधीबाग झोन क्र.6, महानगर पालिका नागपूर
गांधीबाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी
गांधीबाग झोन क्र.6, महानगर पालिका नागपूर
गांधीबाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांच्या वतीने त्यांचे जावई श्री कुळकर्णी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी गांधीबाग झोन क्र.6, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन घर क्र. 554 महाल या मालमत्तेच्या नामांतरणाबाबत व झालेले नामांतर ज्या कागदपत्राच्या आधारे केलेले आहे त्याची माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दि. 17.6.2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र मिळाले. त्यानंतसार त्यांनी माहितीचे शुल्क भरले आणि त्यानंतर त्यांना दि. 27.7.2010 च्या पत्रा प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध

करुन दिली. मात्र त्यांना नामांतरणाची प्रत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्रीमती वर्षा झोलदेव आणि प्रथम अपीलीय अधिकारी श्री अशोक पाटील हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.6.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 7.6.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 8/— भरण्याबाबत दि. 17.6.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि. 17.6.2010 रोजी भरले आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 27.7.2010 च्या पत्राने नोटशिटची झेरॉक्स प्रत आणि कलम 127 च्या नोटीसची प्रत देण्यात आली. मात्र त्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.9.2010 रोजी दिला आणि त्या निर्णयात घर क्र. 554—अ ची नामांतरण व कर निर्धारणाची प्रत 7 दिवसात अपीलकर्त्यास देण्याचे आदेश दिले. त्यानुसार दि. 13.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास नामांतरण व कर निर्धारणाची प्रत पोस्टाने पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र प्रस्तूत प्रकरणात त्यांना नामांतरणाची प्रत स्वतंत्रपणे प्राप्त झाली मात्र नामांतर ज्या कागदपत्राच्या आधारे झाले त्याची प्रत त्यांना हवी आहे. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की या प्रकरणामध्ये फक्त नामांतरण असते त्या प्रकरणात नामांतरणाची नोटीस देण्यात येते. मात्र ज्या प्रकरणात नामांतरण व कर आकारणी असते त्या प्रकरणात नागपूर महानगर पालिका कायदा कलम 127 खाली नोटीस देवून कर आकारणी करण्यात येते. तसेच प्रस्तूत प्रकरणात विक्रीपत्र दि. 18.3.2010 च्या आधारे आणि मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील दि. 12.4.2010 च्या आदेशाप्रमाणे या मालमत्तेचे विभाजन झालेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. तसेच प्रस्तूत प्रकरणात मा. उच्च न्यायालयाच्या दि. 12.4.2010 च्या आदेशाची प्रत अपीलकर्त्याने मागितली म्हणून आयोगा समोर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मा. उच्च न्यायालयाच्या दि. 12.4.2010 च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र वर नमुद केलेल्या विवेचनाप्रमाणे याबाबतची स्पष्टपणे वस्तुस्थिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी अथवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे नामांतरण व विभाजनाबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना स्पष्टपणे कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1723-1725

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 165 नाग/2011**

श्री संतोस चमरु फुंडे
मु. ब्राम्हणी पो. बोरकन्हार
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती आमगाव
ता. आमगाव जि. गोंदिया
2) श्री मेश्राम
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत ब्राम्हणी पो. बोरकन्हार
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत ब्राम्हणी पो. बोरकन्हार ता. आमगाव जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली माहिती मागितलेली होती. त्या माहिती मध्ये निर्मल ग्राम पुरस्कार योजनेत मिळालेला निधी व त्यातून केलेला खर्च यांची माहिती त्यांनी मागितलेली होती. तसेच ते दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पाहिजे. तथापी त्यांना माहिती मिळाली झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आमगाव यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत ब्राम्हणी श्री मेश्राम हे उपस्थित होते. तसेच संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आमगाव यांच्या वतीने श्री खोब्रागडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत ब्राम्हणी श्री मेश्राम यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 25.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी निर्मल ग्राम पुरस्कार योजनेची माहिती व त्यातून केलेला खर्च इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्ता हे दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पाहिजे होती. सदरची ग्रामपंचायत ही लहान असल्यामुळे ग्रामपंचायतचे उत्पन्न देखील कमी आहे. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा झेरॉक्स खर्च सुमारे रु. 560/- अपेक्षित होता. तथापी ग्रामपंचायतची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे त्यांनी अपीलकर्त्यास दि. 11.11.2010 रोजी लेखी पत्र पाठवून ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहून त्यांनी मागितलेल्या माहितीचे निरीक्षण करुन घेण्यात यावे त्यासाठी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळवून निरीक्षणनंतर आवश्यक असलेली माहिती त्यांना पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास यु.पी.सी.द्वारे पाठविले होते. त्याबाबतचा यु.पी.सी.चा लेखी पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे मिळाले नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी सदरचे पत्र यु.पी.सी.ने पाठविले असल्याचे दिसून येते.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले गट विकास अधिकारी श्री खोब्रागडे यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती आमगाव यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी घेतली होती आणि सुनावणी नंतर दि. 18.1.2011 रोजी अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि त्या निर्णयामध्ये असे कळविले की ग्रामपंचायतकडे रक्कम उपलब्ध नव्हती तरी पुन्हा अर्जदाराला माहिती पाहण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात बोलाविण्यास पाहिजे होते. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती पुरवावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सदरची ग्रामपंचायत सुमारे 1200 लोकसंख्येची असून त्याचे वार्षीक उत्पन्न सुमारे रु. 35000/- आहे. म्हणजे उत्पन्नाचे साधन मयादीत आहे. ही बाब लक्षात घेवून अपीलकर्त्याने आयोगासमोर ग्रामपंचायत कार्यालयात दि. 5.5.2011 रोजी उपस्थित राहण्यास व संबंधीत रेकॉर्डचे निरीक्षण करण्यास संमती दिली त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. 5.5.2011 रोजी अपीलकर्त्यास उपस्थित राहून त्यांच्या रेकॉर्डचे निरीक्षण करु द्यावे आणि निरीक्षणा नंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 5.5.2011 रोजी ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी मागीतलेल्या माहितीच्या दस्तऐवजाचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरिक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1727-1729

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 149 नाग/2011**

श्री जनार्दन गुलाबराव मून
केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
791, नागसेनवन, नागपूर –17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. मात्र जन माहिती अधिकारी तथा सचिव आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष हे गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर या संस्थेची घटना तसेच शेडयूल–1 ची सध्याची प्रत व राष्टीय स्मारक घोषीत करण्यापूर्वी स्मारक समिती व राज्य/केंद्र शासनाशी झालेला पत्रव्यवहार व करारनाम्याची सत्यप्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी अध्यक्ष यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे असेही सांगितले की परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर या संस्थे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सायंस कॉलेज चालविले जात असून त्यांना 100 टक्के शासनाचे अनुदान मिळते तसेच दिक्षाभुमीच्या विकासासाठी राज्य/केंद्र शासनाचे अनुदान या संस्थेस मिळते त्यामुळे ही संस्था माहिती अधिकारात मोडते म्हणून त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. तथापी त्यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. 29.3.2011 च्या पत्राने प्रसतूत अपीलाच्या संदर्भात लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्या लेखी निवेदनात त्यांनी असे नमुद केले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर ही संस्था पब्लिक ट्रस्ट ॲक्ट आणि सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट खाली नोंद झालेली आहे. पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली नोंद झालेल्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा लागू नाही असे नमुद करुन त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील युवक शिक्षण संस्था नागपूर आणि डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को. ऑप. बॅंक यांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या प्रती जोडून माहितीचा अधिकार पब्लिक ट्रस्टना लागू नाही असे लेखी निवेदन सचिव यांनी आयोगाकडे दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्तायांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर तसेच सचिव यांनी सादर केलेले लेखी निवेदन विचारात घेता प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर या संस्थेची नोंदणी जरी पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली झालेली असली तरी या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदी लागू आहेत. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर या संस्थे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सायंस कॉलेज चालविले जात असून त्यांना 100 टक्के शासनाचे अनुदान मिळते तसेच दिक्षाभुमीच्या विकासासाठी राज्य/केंद्र शासनाचे अनुदान या संस्थेस मिळते असे लेखी निवेदन अपीलकर्त्याने आयोगासमोर सादर केलेले आहे. तसेच ज्या संस्थांना शासनाचे अनुदान मिळते त्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदी लागू होतात असा निर्णय मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्र. 5168/2011 आणि याचिका क्र. 4407/2010 मध्ये दिलेला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती,दिक्षाभुमी, नागपूर या संस्थेला यांना शासनाकडून वर नमुद केल्याप्रमाणे अनुदान मिळत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतूदी या संस्थेला लागू होतात म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. 25.10.2010 च्या माहिती अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1731-1733

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 174 नाग/2011**

श्री देवराव हुमाजी गावंडे
श्रेयस, 146, छत्रपतीनगर वर्धा नागपूर
ता. जि. नागपूर –440015 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री रमेश माणीकराव सरवदे पोलीस निरीक्षक
जन माहिती अधिकारी
पोलीस स्टेशन भिसी
ता. चिमर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.4.2010 रोजी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 2.3.2010 रोजी मौजा कोलारी ता. चिमर जि. चंद्रपूर येथील पोलीस पाटील श्री गोपीचंद उर्फ गारवड मन्साराम आलोणे (पोलीस पाटील) यांचेवर केलेल्या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या चौकशीचा अहवाल, पंचनामा व कार्यवाही बाबतची माहिती मागितलेली होती. मात्र विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भिसी ता. चिमर जि. चंद्रपूर श्री रमेश माणीकराव सरवदे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचे तर्फे श्री वामन देखमूख पोलीस उपनिरीक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री रमेश माणीकराव सरवदे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.4.2010 चा माहितीचा अर्ज प्रथम पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे त्यांनी पाठविला होता. सदरचा दि. 13.4.2010 चा माहितीचा अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचेकडे दि. 21.4.2010 रोजी पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन भिसी यांचेशी संबंधीत असल्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांनी सदरचा माहितीचा अर्ज दि. 26.4.2010 रोजी सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचेकडे पाठविला तो अर्ज पोलीस स्टेशन भिसीकडे दि. 27.4.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती काढण्यात आली आणि त्या माहितीचे शुल्क रु. 20/— आणि पोस्टाचा खर्च रु. 35/— असे एकूण रु. 55/— भरण्याबाबत दि. 24.5.2010 रोजी ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भिसी यांनी अपीलकर्त्यास साध्या पोस्टाने कळविले. सदरचे पत्र साध्या पोस्टाने पाठविल्या बाबतचा पुरावा म्हणून कार्यालयाचे जावक रजिस्टर त्यांनी आयोगा समोर दाखविले. त्या जावक रजिस्टर मध्ये 681 क्रमांकाने सदरचे पत्र अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येते. मात्र अपीलकर्ता माहितीचे शुल्क भरण्यासाठी त्यांचे कार्यालयात आले नाहीत म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दता आली नाही असे श्री सरोदे यांनी आयोगा समोर सांगितले. मात्र माहितीचे शुल्क भरण्याचे दि. 24.5.2010 चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 2.12.2010 रोजी ठेवली. मात्र सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भिसी यांचेकडील दि. 2.12.2010 चे पत्र शासकीय माहिती अधिकारी यांना उद्येशून लिहिलेले आहे. त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याची दि. 2.3.2010 चे पोलीस पाटील श्री अलोणे यांची तक्रार प्राप्त झालेली नाही असा अहवाल प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिला. त्यानंतर या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 9.12.2010 रोजी ठेवण्यात आली. त्यावेळी अपीलकर्त्यास दि. 24.5.2010 चे माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र तसेच ठाणेदार यांचे दि. 8.7.2010 चे पत्र, अपीलकर्ता माहितीचे शुल्क भरण्यास आले नाहीत त्याचा अहवाल आणि अपीलकर्त्याचे दि. 2.3.2010 चे पोलीस पाटील श्री अलोणे यांचे विरुध्द केलेली तक्रार अर्ज प्राप्त झालेले नाही हा अहवाल वरीलप्रमाणे तीन्ही कागदपत्रे अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 9.12.2010 रोजी उपलब्ध करुन दिले.

6. सदरची तीन्ही कागदपत्रे अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 24.5.2010 च्या पत्राने माहितीची फी भरण्याबाबत जे कळविलेले आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास सहाय्यक

पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन भिसी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र दि. 24. 5.2010 च्या पत्राने पोस्टाद्वारे कळविलेले होते. सदरचे पत्र पोस्टाद्वारे पाठविल्या बाबतचा पुरावा त्यांनी आयोगा समोर दाखविला. म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन घेवून पोलीस स्टेशन भिसी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांनी पोलीस स्टेशन भिसी येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहून माहितीचे योग्य ते शुल्क पोलीस निरीक्षक तथा सहाय्यक जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन भिसी यांचेकडे भरणा करावा. दि. 24.5.2010 च्या पत्रात नमुद केलेली माहिती अपीलकर्त्याने शुल्क भरल्यानंतर सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्वरीत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. मात्र अपीलकर्ता हे व्यक्तीशः माहिती प्राप्त करणार असल्याने पोस्टाचा खर्च सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी लावू नये.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1735-1737

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 175 नाग/2011**

श्री मुकुंद सितारामजी खवसकर, अ.का.
तहसिल कार्यालय साकोली
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हरीष धार्मीक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री सवई
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ते नाझर म्हणून काम करीत असतांना त्यांच्याकडील रक्कम रु. 17365/– त्यांची बदली झाल्याने त्यांनी पदभार ज्या नाझरला दिला त्यामध्ये चुकुन कॅशबुक मध्ये झालेल्या रु. 17365/– च्या खर्चाची नोंद बेरीजमध्ये घेण्यात आली नाही म्हणून त्यांनी पदभार देतांना रु. 17365/– चा भरणा केला. तथापी त्यानंतर त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की रु. 17365/– च्या खर्चाची बेरजेमध्ये चुकुन नोंद झालेली नाही म्हणून त्यांनी जादा भरलेली रु. 17365/– परत मिळण्याबाबत माहिती मागितलेली होती. त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.10.2010 रोजी असे कळविले की आपण चार्ज देतांना रु. 17365/– रक्कम जास्त दिलेली आहे याबाबत

जो आक्षेप घेतला आहे तो चुकीचा आहे कारण आपण जिल्हा नाझार शाखेत जिल्हा नाझार असतांना स्वतःचे वैद्यकीय प्रतीपूर्तीचे देयकाची रक्कम उचल केल्यावर देयकावर रेव्हेन्यू टिकिट लावून सही केली आहे परंतू देयकाची छाया प्रत त्यांना प्राप्त झाली. मात्र रु. 17365/– रक्कम त्यांना परत मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा श्री सवई हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा श्री हरीष धार्मीक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 6.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उत्तर पाठविलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही माहिती अधिकाराच्या ''माहिती'' या व्याख्येत येत नाही म्हणून अपीलकर्त्यास कोणतीही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही त्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील निकाली काढल्याचे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने नाझर या पदाचा पदभार देतांना नजरचुकीने रु. 17365/– रक्कमेच्या झालेल्या खर्चाची नोंद कॅशबुकात घेण्यात आली नाही. नजरचुकीने कॅशबुकात बेरीज करतांना रु. 17365/– हे सुटुन गेले म्हणून त्यांना रु. 17365/– ची जादा भरलेली रक्कम परत मिळावी असा त्यांचा आग्रह आहे. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी रु. 17365/– या व्यवहाराची नोंद कॅशबुकात ज्या दिवशी झालेली आहे त्या दिवसाची कॅशबुकाची नोंदीची तपासणी करावी आणि तपासणी नंतर रु. 17365/– या रकमेबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांनी वर नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयातील कॅशबुकाच्या संबंधीत नोंदीची तपासणी करुन खात्री करावी आणि अपीलकर्त्यास रु. 17365/- रकमे बाबतची वस्तुस्थिती कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1739-1741

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 173 नाग/2011**

श्री देवराव हुमाजी गावंडे
श्रेयस, 146, छत्रपतीनगर वर्धा रोड, नागपूर
मु. ता. जि. नागपूर –440015 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री उमेश काळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर

2) श्री डी. डब्लू. आखाडे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 22.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांचेकडील दि. 24.12.2009 च्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे मौजा कोलारी ता. चिमूर येथील भूखंड क्रमांक 365 मधील नैसर्गिक पावसाचे पाणी भूखंड क्र. 364 मधून पूर्वापार काळापासून वाहात जाण्याचा मार्ग बंद करुन कोर्ट वि. एम.एम.भूषणवार तहसिलदार चिमूर यांच्या निर्णयाचा अपमान करणे बाबतचा चौकशी अहवाल व कार्यवाही अहवालाची प्रत त्यांनी मागितलेली होती. मात्र विहित मुदतीत त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 9.12.2010 रोजी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, वरोरा यांचेकडे दाखल

केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपूर्ण माहिती दिली. त्यांनी सर्व्हे नं. 365 ची माहिती मागितलेली होती. परंतू त्यांना सर्व्हे नं. 374 ची माहिती दिली. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि त्यांना माहिती देण्यास विलंब झाल्याबद्यल जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर श्री आखाडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वरोरा श्री उमेश काळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.3.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे उपविभागीय अधिकारी, वरोरा यांच्या दि. 7.4.2010 च्या पत्राने त्यांचेकडे दि. 12.4.2010 रोजी डाकेने प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मंडळ अधिकारी शंकरपूर व तलाठी साठगाव यांचेशी संबंधीत असल्यामुळे दि. 16.4.2010 च्या पत्राने सदरचा अर्ज त्यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास परस्पर माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले होते. मात्र दि. 16.4.2010 च्या पत्राची प्रत त्यांनी अपीलकर्त्यास दिलेली नव्हती. तथापी तलाठी साठगाव यांनी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर यांचेकडे दि. 20.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर तहसिलदार चिमूर यांनी त्यांचेकडील दि. 20.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 रोजी यु.पी.सी.व्दारे माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर त्यांनी दि. 9.12.2010 रोजी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, वरोरा यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी उपविभागीय अधिकारी, वरोरा यांनी दि. 9.12.2010 रोजी घेतली. आणि निर्णय देखील दि. 9.12.2010 रोजी दिला आणि त्यामध्ये तहसिलदार चिमूर यांनी अपीलकर्त्यास मंडळ अधिकारी यांचेकडील नकाशा व पंचनाम्याची प्रत द्यावी तसेच तहसिलदार चिमूर यांचे दि. 7.3.2003 च्या आदेशान्वये पोलीस पाटील अलोणे यांनी 7/12 वर नोंद घेतली नाही ती नोंद घेण्यात यावी व नोंद घेतलेल्या 7/12 ची प्रत पुरविण्यात यावी. सदरची माहिती तहसिलदार चिमूर यांनी अपीलकर्त्यास 7 दिवसाचे आत पुरवावी असा प्रथम अपीलाचा निर्णय उपविभागीय अधिकारी यांनी दिला असे उपविभागीय अधिकारी, वरोरा श्री उमेश काळे यांनी सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलकर्त्यास दि. 20.12.2010 च्या पत्राने दि. 22.12.2010 रोजी यु.पी.सी.द्वारे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र सदरची माहिती त्यांना विलंबाने प्राप्त झाली तसेच त्यांना तहसिलदार यांनी दि. 7.3.2003 चा आदेश पारीत केला त्यावेळच्या पंचनाम्याची प्रत त्यांना पाहिजे होती. परंतू ती प्रत त्यांना मिळाली नाही याबाबत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी असे सांगितले की तहसिलदार यांनी दि. 7.3. 2003 जो आदेश पारीत केला आहे त्यावेळी कोणताही पंचनामा केलेला दिसून येत नाही म्हणून त्याची प्रत देता येत नाही. तसेच अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास झालेल्या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाच्या कालावधीत त्यांचेकडे 92 ग्रामपंचायत यांचा तीन टप्प्यात निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झालेला होता. तसेच मंडळ अधिकारी शंकरपूर हे पद रीक्त होते त्यामुळे त्यास विलंब झालेला आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 6.3.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर यांच्या कार्यालयाकडे दि. 12.4.2010 रोजी प्राप्त झालेला होता. त्यानंतर तहसिलदार चिमूर यांनी अपीलकर्त्यास दि. 20.12.2010 च्या पत्राने म्हणजे सुमारे 8 महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा योग्य व समर्थनीय दिसून येत नाही. कारण माहिती अधिकारात अपीलकर्त्यास 30 दिवसाचे मुदतीत उत्तर पाठविणे आवश्यक असते. तसेच दि. 16.4.2010 च्या पत्राने मंडळ अधिकारी शंकरपूर व तलाठी साठगाव यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या पत्राची प्रत देखील अपीलकर्त्यास त्यांनी पाठविलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास तहसिलदार चिमूर हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा मान्य करण्या सारखा नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर यांनी अपीलकर्ता यांना असे कळवावे की तहसिलदार चिमूर यांनी दि. 7.3.2003 चा जो आदेश पारीत केला आहे त्यावेळी कोणताही पंचनामा केलेला दिसून येत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळवावे.

2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चिमूर यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही उपविभागीय अधिकारी वरोरा यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1743-1746

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 198 नाग/2011

श्री आनंदकर मधुकररावजी मेश्राम
वार्ड नं. 2, नविन वसाहत, बावलानगर बुटिबोरी
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती काकडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त
राज्य कामगार विमा योजना,
मु.गांधी स्मरणीय रुग्णालय, 3 रा मजला,
डॉ.एस.एस.राव मार्ग, परेल मुंबई 400012
2) श्री ए. एम. श्रीखंडे
जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग, इमामवाडा, नागपूर
ता. जि. नागपूर 3 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, विदर्भ विभाग, इमामवाडा, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन चतुर्थ श्रेणी कर्मचा–याची नियुक्ती आणि बदली संदर्भात सन 1989 ते सन 2010पर्यंत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 14.10.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 1048/– भरण्याबाबत कळविले. तथापी माहितीचे शुल्क रु. 1048/– कोणत्या झेरॉक्स कागदांचे आहेत याची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेली होती. आणि सुधारीत फी भरुन घेण्याबाबत कळवावे असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. 26.10.10 च्या पत्राने कळविले. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडून सुधारीत शुल्क

भरण्याबाबत त्यांना काहीही कळविलेले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याने दि. 27.9.2010 च्या माहिती अर्जात मागितलेल्या माहितीचा दस्तऐवज अपीलकर्त्याने अवलोकन करुन त्यांना जी माहिती हवी आहे ती निवडून त्याच्या शुल्काचा भरणा कार्यालयात केल्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतरही त्यांना माहिती मिळाली झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय प्रशासन अधिकारी श्री श्रीखंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती काकडे हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या माहितीच्या अर्जात सन 1989 ते सन 2010पर्यंत चतुर्थ श्रेणी कर्मचा–याची नियुक्ती आणि बदली संदर्भात सन 1989 ते सन 2010पर्यंत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास एकुण 524 छायांकीत प्रतीची फी रु. 1048/– भरण्याबाबत दि. 14.10.2010 च्या पत्राने कळविले. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 13.4.2010 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील दस्तऐवज निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावा आणि त्यानंतरही अपीलकर्त्यास जी माहिती हवी आहे ती निवडून त्या रकमेचा भरणा कार्यालयात केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आल्याचे श्रीमती काकडे यांनी सांगितले.

5. जन माहिती अधिकारी श्री श्रीखंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की प्रथम अपीलाचा निर्णय त्यांचे कार्यालयाकडे दि. 26.4.2010 रोजी प्राप्त झाला. आणि त्या निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 3.5.2011 रोजी दस्तऐवजाचे निरीक्षण करुन घेण्यासाठी कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. तथापी अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात हजर झाले नाही. म्हणून अपीलकर्त्यास दस्तऐवजाचे निरीक्षण देवून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. सदरचे दि. 3.5.2011 चे जन माहिती अधिकारी यांचे पत्र अपीलकत्या पोस्टाद्वारे अद्यापपर्यंत प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 27.9.2010 च्या माहिती अर्जातील मागितलेल्या माहितीच्या दस्तऐवजाचे अपीलकर्त्याने

निरीक्षण करुन घेवून त्यांना हवी असलेली माहिती त्यांनी निवडून व त्या माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दि. 11.5.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून दस्तऐवजाचे निरीक्षण करुन घेवून त्यांना पाहिजे असलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रतींची फी भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आवश्यक ते दस्तऐवज निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे आणि निरीक्षणानंतर यांना पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन घेवून त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1748-1750

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 197 नाग/2011**

श्री आर. डी. दहाट
C/o. श्री जी.ए.बन्सोड, 65 विवेकानंद नगर
साईमंदीर मागे, वर्धा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त
परिमंडळ–4 नागपूर
सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर
2) श्री संतोष वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
सक्करदरा विभाग, सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील पत्र क्र. जिपना/शिअ/माध्य./5127/08 दि. 18/20.9.2008 नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर श्री संतोष वानखेडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ–4 नागपूर सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर यांच्या वतीने हेड कॉन्टेबल श्री अशोक तिडके हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा त्यांचे कार्यालयाकडे दि. 16.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सक्करदरा पोलीस स्टेशन नागपूर येथे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील पत्र क्र. जिपना/शिअ/माध्य./5127/08 दि. 18/20.9.2008 नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती पोलीस स्टेशन सक्करदराशी संबंधीत असल्यामुळे सक्करदरा पोलीस स्टेशन यांना पत्र लिहून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडून माहिती मागितली. त्याला अनुसरुन सक्करदरा पोलीस स्टेशन यांचेकडून माहिती प्राप्त झाली आणि अपीलकर्त्यास दि. 29.11.2010 च्या पत्राने असे कळविले की आपल्या अर्जातील माहिती पोलीस स्टेशन सक्करदरा यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडून माहिती मागितली असता त्यांनी असे कळविले की पोलीस स्टेशन सक्करदरा येथे असलेले सन 2008 चे अर्ज आवक रजिस्टरची बारकाईने पडताळणी केली असता अर्जदाराचे अर्ज पोलीस स्टेशन सक्करदरा येथे मिळाल्याचे आवक रजिस्टर अंतर्गत नोंद नाही आणि म्हणून सक्करदरा पोलीस स्टेशनचे दि. 22.11.2010 च्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यावरुन असे दिसते की शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचे वर नमुद केलेले पत्र त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही अशी माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 17.1.2010 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचे वर नमुद केलेले पत्र पोलीस स्टेशन सक्करदरा येथे प्राप्त झाले नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढल्याचे सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील वर नमुद केलेले 18/20.9.2008 चे पत्र पोलीस स्टेशन सक्करदरा येथे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही म्हणून त्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवलेला नाही. तथापी आजच्या सुनावणीस आयोगासमोर अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी यांचे वरील पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिले. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर प्राप्त केले म्हणून जन

माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी यांच्या पत्राची प्रत त्यांना उपलब्ध झाल्यामुळे त्यावर 30 दिवसाचे आंत कार्यवाही करुन त्याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडील वर नमुद केलेले 18/20.9.2008 च्या पत्रावर योग्य ती कार्यवाही करावी आणि अपीलकर्ता यांना केलेल्या कार्यवाहीची माहिती व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1752-1754

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 196 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
रा.विशाखा निवास, अजय नगर
अंबाझरी हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर –440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. डब्लु. खंडाळ
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री आर. आर. अंबादे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत आमगाव (देवळी)
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत आमगाव (देवळी) यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.1.2009 ते दि. 25.11.2010 या कालावधीची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती मध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्याबद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात आलेल्या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योजनेच्या ठरावाप्रमाणे प्रत, वितरीत केलेल्या रकमेचा तपशिल, ग्रामपंचायतच्या प्रत्येक कर्मचारीच्या कामाचा तक्ता, ग्रामसेवकाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानकेची माहिती तसेच धोरण तयार करण्या संदर्भात व्यवस्थेची माहिती इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती

अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलामध्ये 10 दिवसात माहिती पुरविण्याबाबत निर्णय झाला त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत आमगाव (देवळी) श्री आर. आर. अंबादे हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.11.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यांना असे दिसून आले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपात व विस्तृत प्रमाणात असल्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध होत नव्हता म्हणून अपीलकर्त्यास दि. 21.12.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीच्या सदर्भात संभ्रम तयार होत असून माहितीच्या अधिकारात झेरॉक्स स्वरुपात माहिती मागणे अपेक्षित आहे. म्हणून संबंधीत माहिती आपणास कोणती हवी आहे त्या संबंधात स्पष्टपणे उल्लेख करावा तेव्हाच माहिती पुरविण्यात येईल. आपण स्पष्ट माहिती मागण्यास विलंब केल्यास त्याला आपण स्वतः जबाबदार राहाल याची जाणीव देखील अपीलकर्त्यास दि. 21.12.2010 च्या पत्राने दिलेली होती. मात्र अपीलकर्त्याने स्पष्टपणे माहिती मागितली नाही. सदरचे दि. 21.12.2010 चे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने जावक क्रमांक 326 ने पाठविल्याचे सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी दाखविले. तथापी सदरचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलामध्ये 10 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याबाबतचा निर्णय दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती तयार केली तथापी अपीलकर्ता सदरची माहिती व्यक्तीशः घेण्यास कार्यालयात हजर न झाल्यामुळे माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1752-1754

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 195 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
रा.विशाखा निवास, अजय नगर
अंबाझरी हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर –440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. डब्लु. खंडाळ
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री शामराव भिसे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत इसासनी
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत इसासनी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.1. 2009 ते दि. 12.11.2010 या कालावधीची माहिती मागितलेली होती. सदरच्या माहिती मध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्याबद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात आलेल्या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योजनेच्या ठरावाप्रमाणे प्रत, वितरीत केलेल्या रकमेचा तपशिल, ग्रामपंचायतच्या प्रत्येक कर्मचारीच्या कामाचा तक्ता, ग्रामसेवकाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके इत्यादींची माहिती तसेच धोरण तयार करण्या संदर्भात व्यवस्थेची माहिती इत्यादी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जन

माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलामध्ये 10 दिवसात माहिती पुरविण्याबाबत निर्णय झाला त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत इसासनी श्री भिसे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय हिंगणा श्री एन. डब्लु. खंडाळ हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री भिसे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.11.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन त्यांनी दि. 8.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपण माहितीच्या अधिकारात ग्रामपंचायतच्या दि. 1.1.2009 ते दि. 12.11.2010 या कालावधीची माहिती मागितलेली आहे. ती माहिती संदिग्ध स्वरुपाची असल्यामुळे त्याचा बोध होत नाही म्हणून आपल्याला नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे त्याबद्यल सविस्तर विवरण द्यावे व माहिती घेवून जावी. परंतू अपीलकर्त्याने स्पष्ट माहितीचे विवरण दिले नाही तसेच त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की त्यांनी मागितलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू अपीलकर्त्याने काही उत्तर दिले नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास माहिती देणे शक्य झाले नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी कागदपत्राच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती 8 दिवसात देण्याचा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 19.4.2011 रोजी पत्र पाठवून माहिती घेवून जाण्याबाबत कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता माहिती घेण्यास आलेले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1756-1758

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 210 नाग/2011

श्री शामदेव काशिरामजी तितरमारे
270 चंदननगर, पो. हनुमाननगर
ता. जि. नागपूर –9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. एल. उंबरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. एस. कुदरे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दिनांक 12.11.2010 च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 15.12.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक 9.5.2011 च्या पत्राने अपीलकर्ता यांच्या दिनांक 12.11. 2010 च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना देण्यात आली. परंतू प्रस्तूत

प्रकरणात गुन्हा किंवा विभागीय चौकशीच्या संदर्भात टिपणी पुरविलेली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) श्री एस. एस. कुदरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री एच. एल. उंबरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) श्री कुदरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दिनांक 12.11. 2010 च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. ती माहिती अपीलकर्त्यास दि. 15.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये अपीलकर्त्याच्या दिनांक 12.11.2010 च्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र प्रस्तूत प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक 9.5.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांच्या अपील अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये अपीलकर्त्यास असे कळविले की आपल्या दिनांक 12.11.2010 च्या अर्जावर सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) यांनी चौकशी केली आणि त्या चौकशीचा अहवाल दिनांक 9.5.2011 रोजी प्राप्त झाला असून त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दिनांक 9.5.2011 चे पत्र अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तूत प्रकरणी असे म्हणणे आहे की त्यांचेकडील दिनांक 12.11.2010 च्या निवेदनावर चौकशी संदर्भात संबंधीता विरुध्द गुन्हा किंवा चौकशीची कार्यवाही लवकर करावी. याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 12.11.2010 च्या अर्जावर चौकशी पूर्ण झालेली असून त्या संदर्भात गुन्हयाची कार्यवाही किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही प्रलंबीत आहे त्यावर निर्णय झाला म्हणजे तो निर्णय अपीलकर्त्यास कळविण्यात येईल असे त्यांनी आयोगा पुढे सुनावणीत सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दिनांक 12.11.2010 च्या अर्जावर चौकशी पूर्ण झालेली असून त्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी त्या संदर्भात गुन्हा किंवा विभागीय चौकशी संबंधी करावयाच्या कार्यवाहीचा निर्णय होणे सद्यस्थितीत प्रलंबीत आहे. म्हणून या चौकशी अहवालावर करावयाच्या कार्यवाही संदर्भात निर्णय झाल्यानंतर अपीलकर्त्यास त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. अपीलकर्त्याच्या दिनांक 12.11.2010 च्या अर्जावर चौकशी पूर्ण झालेली आहे. त्या चौकशीच्या संदर्भात गुन्हा किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही सद्यस्थितीत प्रलंबीत आहे. त्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यावर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य केलेल्या कार्यवाहीची माहिती पुरवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1759-1761

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 207 नाग/2011**

श्री मनोहर शामराव मंथनवार
तर्फे श्री गोपाल सोनवाने, हनुमान मंदिर जवळ
राजगोपालाचारी वार्ड भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त(रोहयो)
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक
ता. जि. नाशिक

2) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो)
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक
ता. जि. नाशिक ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 10.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील रोहयो कामाच्या विभागीय चौकशी संदर्भात माहिती मिळणेबाबत 1 ते 8 कॉलमचा नमुना तयार करुन त्या नमुन्यात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10.2010 च्या पत्राने असे कळविले की सदर अर्जात मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात हस्तलीखीत वा टंकलीखीत केलेली नाही. म्हणून

आपल्या अर्जात मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्याने आपणास सदरची माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील उपायुक्त(रोहयो) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 4.1.2011 रोजी देण्यात आला. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 7 दिवसात माहिती अर्जातील माहिती विनामुल्य पुरविण्याबाबत आदेश दिले. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 8/14.2.2011 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती ज्या प्रकरणात अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील विभागीय चौकशी सुरु आहे त्या प्रकरणाची माहिती दिली आहे. प्रत्यक्षात ज्या प्रकरणामध्ये रोहयो कामाची विभागीय चौकशी सुरु होवून अंतिम कारवाई झाली आहे त्याची माहिती त्यांनी दिलेली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो) नाशिक यांच्या वतीने आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त(रोहयो) नाशिक यांच्या वतीने श्री एम.बी.शेवाळे सहाय्यक लेखाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री एम.बी.शेवाळे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.9.2010 चा माहितीचा अर्ज पोस्टाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. 12.10.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विशिष्ट नमुन्यात मागितलेली होती. तथापी माहितीच्या अधिकारात नमुना तयार करुन त्या नमुन्यातील माहिती संकलीत करुन देण्याची तरतुद नाही. म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10. 2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात हस्तलीखीत वा टंकलीखीत केलेली नाही. म्हणून सदरची माहिती उपलब्ध नसल्याने आपणास देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपायुक्त(रोहयो) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 4.1.2011 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या अर्जाप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली व शासनास

सादर केलेली माहिती अपीलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला.

6. प्रथम अपीलाच्या या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीतून अपीलकर्त्याने तयार करुन दिलेल्या नमुन्यात सदरची माहिती भरण्यात आली त्या नमुन्यात माहिती भरण्यासाठी बराचसा कालावधी लागला तसेच त्याच दरम्यान विधान मंडळ रोजगार हमी योजना समितीची अहमदनगर जिल्हयाची बैठक दि. 13 व 14 जाने. 2010 रोजी लागल्याने त्याचीही माहिती जन माहिती अधिकारी यांना काढावी लागली आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 14.2.2011 च्या पत्राने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती ही ज्या प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे त्या प्रकरणाची माहिती त्यांना दिलेली आहे. ज्या प्रकरणामध्ये रोहयो कामाची विभागीय चौकशी सुरु होवून अंतिम कारवाई झाली आहे अशाच प्रकरणाची माहिती मागितलेली होती असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री एम.बी. शेवाळे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांचेकडे अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील विविध रोहयो कामाच्या विभागीय चौकशी संदर्भात माहिती मागितलेली होती. म्हणून सदरची माहिती देण्यात आलेली आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील विविध रोहयो कामाच्या विभागीय चौकशी संदर्भात माहिती दिलेली आहे. तथापी त्या व्यतिरीक्त या दोन तालुक्याच्या विविध रोहयो कामाची विभागीय चौकशी सुरु होवून अंतिम कारवाई झाली आहे त्याची माहिती दि. 1.2.2005 ते 6.2.2010 या कालावधीची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी या दोन्ही तालुक्यातील रोहयो कामाची विभागीय चौकशी पूर्ण होवून अंतिम कारवाई झाली नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील ज्या रोहयो कामाची विभागीय चौकशी सुरु होवून अंतिम कारवाई झाली आहे त्याची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच अहमदनगर व संगमनेर तालुक्यातील रोहयो कामाच्या वरील कालावधीत

विभागीय चौकशी पूर्ण होवून अंतिम कारवाई झाली नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1776-1779

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 208 नाग/2011

श्री मनोहर शामराव मंथनवार
तर्फे श्री गोपाल सोनवाने, हनुमान मंदिर जवळ
राजगोपालाचारी वार्ड भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुपेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग अहमदनर
सिंचन संवा भवन, औरंगाबाद रोड,
अहमदनर – 414001
2) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग अहमदनर
सिंचन संवा भवन, औरंगाबाद रोड,
अहमदनर – 414001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.52011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 26.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग अहमदनर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 17.8.1992 ते दि. 31.12.1993 या कालावधीच्या रोहयो हजेरीपटातील भाग 3 च्या प्रमाणीत प्रती मागितलेल्या होत्या. तसेच या रोहयो हजेरीपट क्रमांक अंतर पृष्ठ क्रमांकासह माहिती मागितलेली होती. आणि लघु पाटबंधारे विभाग पाथर्डी या कार्यालयाचे पत्र क्र. 556/दि. 2.9.1993 चे पत्राची प्रमाणीत प्रत मागितलेली होती. अपीलकर्त्यास दि. 2.9.1993 च्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध

करुन दिली मात्र हजेरीपटाच्या प्रती आणि हजेरीपट क्रमांक अंतर पृष्ठ क्रमांकासह त्याच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.9.2010 च्या पत्राने ही माहिती उपलब्ध नाही असे कळविले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना हजेरीपटाची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांच्या वतीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री सुपेकर उपस्थित होते.

4. श्री सुपेकर कार्यकारी अभियंता यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 26.8.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 9.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपण मागितलेले रोहयो हजेरीपट हे सन 1992–93 च्या कालावधीचे असल्यामुळे सदरचे दस्तऐवज हे सुमारे 17 वर्षा पूर्वीचे असल्यामुळे रेकॉर्ड रुम मध्ये त्याचा शोध घेवूनही उपलब्ध झालेले नाही. म्हणून हजेरीपटाच्या प्रती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. आणि अपीलकर्त्याने दि. 29.9.2010 च्या पत्राची प्रत मागितलेली होती ती प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे दि. 29.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र हजेरीपटाच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

5. प्रस्तूत प्रकरणी कार्यकारी अभियंता श्री सुपेकर यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की शासनाच्या पी.डब्लू.डी.मॅन्युअल मध्ये हजेरीपट जतन करण्याचा कालावधी नमुद केलेला आहे. त्यामध्ये मॅन्युअलच्या पृष्ठ क्रमांक 293 वर अनुक्रमांक 272 मध्ये रोहयो योजनेखाली कामाच्या हजेरीपटाचा जतन कालावधी हा 5 वर्षाचा केलेला आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 17 वर्षा पूर्वीची आहे. तसेच या कालावधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे तीन ठिकाणी स्थलांतर झालेले आहे. त्यामुळे सन 1992–93 च्या हजेरीपटाच्या प्रती आता शोध घेवूनही उपलब्ध होत नाही आणि याची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे असे श्री सुपेकर यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच कार्यकारी अभियंता श्री सुपेकर यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या हजेरीपटाच्या प्रमाणित प्रती हया सन 1992–93 कालावधीच्या म्हणजे सुमारे 17 वर्षा पूर्वीच्या आहे. पी.डब्लू.डी. मॅन्युअल प्रमाणे रोहयो कामावरील मजुराच्या हजेरीपटाचा कालावधी हा 5 वर्षाचा आहे.

म्हणून सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात शोध घेवूनही उपलब्ध झालेली नाही आणि तसे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.9.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1777-1779

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 223 नाग/2011

श्री साबाजीराव गोपाळराव दळवी
16 महाराष्ट्र बॅक रोड, अमोल फार्मसी जवळ
अयोध्यानगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई
9 हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी अर्मिनस(व्हीटी) समोर
मुंबई 400001
2) श्री आर. डी. शिरसाठ
जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक
राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई
9 हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी अर्मिनस(व्हीटी) समोर
मुंबई 400001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्रीमती ललीता सतई यांनी मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. 526/2006–2007 प्रकरणात मा. न्यायाधीश श्री मुन्शी साहेब यांनी दिलेल्या दि. 9.11.2010 च्या आदेशाची सर्टिफाईड कॉपी मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 28.5.2010 च्या पत्राने आपण मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे त्या त्रयस्थ पक्षाकडून माहिती बाबत अनुमती मागितली होती. परंतू त्रयस्थ पक्ष श्रीमती ललीता सतई यांनी माहिती देण्यात येवू नये असे कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास दि. 28.5.2010

च्या पत्राने नकार दिलेला आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून दि. 30.11.2010 रोजी आदेश पारीत केला आणि त्या आदेशामध्ये अपीलकर्त्याचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मागितलेली माहिती पुरविण्याचे आदेश दिलेले होते. तथापी त्यांना मागितलेली माहिती अद्याप मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई आणि प्रथम अपीलीय अधिकारी राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या वतीने श्री आर. डी. शिरसाठ हे उपस्थित होते.

4. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 27.4.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी श्रीमती ललीता सतई यांनी मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेल्या केस क्र. 526/2006–2007 प्रकरणात मा. न्यायाधीश श्री मुन्शी साहेब यांनी दिलेल्या दि. 9.11.2010 च्या आदेशाची सर्टिफाईड कॉपी मागितलेली होती. सदरची मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्या त्रयस्थ पक्ष त्रयस्थ पक्ष श्रीमती ललीता सतई यांना दि. 30.4.2010 ला पत्र पाठवून माहिती देण्याबाबत त्यांची अनुमती मागितली. श्रीमती ललीता सतई यांनी दि. 19.5.2010 ला पत्र पाठवून अपीलकर्त्यास माहिती देण्यात येवू नये असे कळविले. तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ. निना खापर्डे यांनी अपीलकर्त्यास दि. 28.5.2010 च्या पत्राने असे कळविले की त्रयस्थ पक्षाने आपण मागितलेली माहिती देण्यास नकार दिलेला आहे म्हणून आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले.

5. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 28.9.2010 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून दि. 30.11.2010 रोजी आदेश पारीत केला आणि त्या आदेशामध्ये अपीलकर्त्याचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मागितलेली माहिती पुरविण्याचे आदेश दिलेले होते.

6. तथापी त्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ. निना खापर्डे हया दि. 30.11.2010 रोजी रजेवर गेल्या आणि त्यानंतर साधारण एक महिन्यानी रजेवर राहून दि. 5.1.2011 रोजी त्यांनी पोस्टाद्वारे राजीनामा पाठविला त्यांचा राजीनामा दि.10.1.2011 रोजी स्वीकृत केला. त्यानंतर दि. 15.1.2010 च्या आदेशाने सचिव राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी सौ. निना खापर्डे यांनी प्रबंधक पदाचा राजीनामा दिल्यामुळे जन माहिती अधिका–याच्या नियुक्तीचे आदेश नव्याने निर्गमीत केला. त्यानंतर त्या आदेशाने

दि. 15.1.2010 पासून विधी शाखेचे जन माहिती अधिकारी हे कक्ष अधिकारी आणि सहा. जन माहिती अधिकारी म्हणून सहा. प्रबंधक यांची नेमणूक झाली.

7. त्यानंतर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात शोध घेण्यात आला आणि अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती त्यांनी तयार केली आणि आयोगा समोर सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली आणि सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्या बद्यल अपीलकर्त्याने आयोगा समोर नाराजी व्यक्त केली.

8. अपीलकर्ता तसेच सहा. जन माहिती अधिकारी श्री शिरसाठ यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.11.2010 रोजी दिला होता आणि त्या निर्णयात अपीलकत्यास माहिती पुरविण्याचे आदेश दिलेले होते. तसेच अपीलकर्त्याने राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाखल केलेल्या केसच्या संदर्भात दि. 9.11.2009 रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत मागितलेली होती. सदरच्या आदेशाची प्रत देण्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला होता म्हणून त्वरीत त्यांना ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी हया दि. 30.11.2010 ते दि. 5.1.2010 पर्यंत म्हणजे राजीनामा देईपर्यंत रजेवर होत्या. त्यांच्या हया कालावधीत त्यांचा पदभार ज्या अधिका–याकडे होता त्यानी ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू या प्रकरणात तशी कार्यवाही झालेली दिसत नाही. तसेच दि. 15.1.2010 च्या आदेशाने विधी शाखेचे कक्ष अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमलेले आहेत. त्यांनी देखील हया बाबतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी त्यानी देखील अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. त्यानंतर आयोगा समोर आजच्या सुनावणीस अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे. म्हणून सदरच्या विलंबास श्रीमती खापर्डे तत्कालीन जन माहिती अधिकारी हया रजेवर असतांना त्यांचा पदभार ज्या अधिका–याकडे होता तो अधिकारी आणि दि. 15.1.2010 च्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केलेले कक्ष अधिकारी यांनी त्यांच्या नेमणूकीनंतर अपीलकर्त्यास का माहिती उपलब्ध करुन दिली नाही याचा खुलासा हा अदेश मिळाल्या पासून 15 दिवसाचे आत आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येईल याची नोंद घ्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुमारे 5 महिने विलंबाने माहिती उपलब्ध झालेली आहे म्हणून या कालावधी जन माहिती अधिकारी यांचा पदभार ज्या अधिका–याकडे होता त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची का शिफारस करण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत सादर करावा.
3) सदरच्या आदेशाची प्रत सचिव राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे विलंबा बद्यल खुलासा सादर करण्यासाठी पाठवावा.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1778-1781

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 221 नाग/2011**

श्री रमेश रामजी राठोड
20, विज्ञान नगर मानेवाडा, नागपूर
ता. जि. नागपूर –440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद
राज पेट्रोलपंप मागे, जालना रोड, औरंगाबाद
2) श्री ए. के. बोरकर
जन माहिती अधिकारी तथा गृहपाल
आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, औरंगाबाद
बहादूरपूरा, सिडको एन–8, औरंगाबाद ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा गृहपाल आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, औरंगाबाद यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री प्रविण साईनदास पवार (B.Sc.Agriculture) या विद्यार्थ्याच्या प्रवेशा संबंधी खालील चार मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

1. प्रवेशासाठी भरुन दिलेला अर्ज, 2. पालकांनी भरुन दिलेला अर्ज, 3. प्रवेश यादी आणि 4. कोणत्या आधारावर प्रवेश मिळाला त्याचे कागदपत्र अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील त्यांचे फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा गृहपाल श्री ए. के. बोरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांच्या वतीने श्री ए. के. बोरकर यांनाच अधिकृत केलेले होते

4. जन माहिती अधिकारी तथा गृहपाल श्री ए. के. बोरकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपीलकर्त्याने दि. 57.2010 च्या माहितीच्या अर्जात जी माहिती मागितली आहे त्या माहितीचा अर्ज दि. 15.3.2010 रोजी प्रकल्प कार्यालयाकडून प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने श्री प्रविण साईनदास पवार (B.Sc.Agriculture) या विद्यार्थ्याबाबत वर नमुद केल्याप्रमाणे 1 ते 4

मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 13.4.2010 च्या पत्राने रजिस्टर पोस्टाने उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आलेली आहे आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच पावतीची छायांकीत प्रत त्यांनी आयोगाकडे सादर केली. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने वरीष्ठ कार्यालयाकडे माहिती न मिळाल्याबपबत कळविल्याने पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.6.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्यात आली त्याची पोच देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केली.

5. जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.4.2010 च्या पत्राने आणि दि. 18.6.2010 च्या पत्राने पाठविण्यात आलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना मुद्या क्र. 3 प्रवेश यादी पूर्ण स्वरुपात मिळाली नसल्याचे सांगितले. सदरच्या प्रवेश यादीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा आयोगा समोर उपलब्ध करुन दिली ती अपीलकर्त्याने स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून वर नमुद केल्याप्रमाणे दि. 13.4.2010 च्या पत्राने आणि दि. 18.6.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1783-1784

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 222 नाग/2011**

श्री मंगेश विजय वनवे
भूखंड क्र.24, अनुशक्ती नगर गायत्री कॉलनी
हजारीपहाड ते भिवसेन खोरी रोड
हजारीपहाड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश वराडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक
कर व कर आकारणी विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एम. डी. सुभेदार
जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक
कर व कर आकारणी विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक कर व कर आकारणी विभाग, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महानगर पालिके कडील 1) परीपत्रक क्र. 540/अेडी दि.13.12.2006 हे परीपत्रक महानगर पालिकेच्या 10 झोन मध्ये कोणत्या तारखेला पाठविले त्याची माहिती मागितलेली होती. 2) महानगर पालिके कडील दि.13.12.2006 च्या परीपत्रकात नमुद केलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिकेची प्रत त्यांनी मागितलेली होती. 3) किती इंचाची पाईप लाईन असल्यास आम पाणी कर आकारण्यात येतो अशा तीन मुद्यांची माहिती मागितलेली होती. त्यांना मुद्या क्र. 1 बाबत माहिती प्राप्त झाली परंतू सदरच्या परीपत्रकाची प्रत झोन क्र. 5,6,3,9,10 यांना पाठविल्याची माहिती त्यांना

मिळाली. मात्र झोन क्र. 1,2,4,7,8 या झोनला सदरचे परीपत्रक कधी पाठविले त्याची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच त्यांनी मागितलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिकेची प्रत त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक श्री सुभेदार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक श्री प्रकाश वराडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री सुभेदार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 9.9.2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत् कळविले. अपीलकर्त्याने दि. 17.9.2010 रोजी माहितीचे शुल्क भरणा केले आणि अपीलकर्त्यास दि. 29.9.2010 रोजी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. तसेच त्यांनी आयोगा पुढे असेही सांगितले की अपीलकर्त्याने महानगर पालिकेचे दि.13.12.2006 चे परीपत्रक किंती तारखेला सर्व झोन कडे पाठविली याची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती सन 2006 च्या कालावधीची असल्यामुळे सन 2006 च्या डाकबुकात सदरचे परीपत्रक झोन क्र. 5,6,3,9,10 यांना पाठविल्याचे दिसून आले आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. मात्र त्या डाकबुकात सदरचे परीपत्रक झोन क्र. 1,2,4,7,8 यांचेकडे पाठविल्याचे दिसून आले नाही म्हणून त्याबाबत माहिती देता आली नाही. म्हणून सदरचे परीपत्रक झोन क्र. 1,2,4,7,8 यांना डाकबुकामधून सन 2006 साली पाठविल्याचे दिसून येत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तीक होईल. तथापी सदरचे परीपत्रकाची प्रत अंमलबजावणीसाठी या झोनला पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिकेची प्रत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले तसेच अपीलकर्त्याने पाईप लाईन बाबत मागितलेली माहिती ही माहिती अपीलकर्त्यास पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक श्री प्रकाश वराडे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की महानगर पालिकेच्या दि.13.12.2006 च्या परीपत्रकाची प्रत सन 2006 साली सर्व झोनकडे पाठविणे आवश्यक होते. तथापी सन 2006 चे डाकबुक पाहिले असता त्यामध्ये सदरचे परीपत्रक झोन क्र. 5,6,3,9,10 यांना पाठविलेले आहे मात्र परीपत्रक झोन क्र. 1,2,4,7,8 यांना डाकबुकामधून सन 2006 साली

पाठविल्याचे दिसून येत नाही. मात्र सदरच्या परीपत्रकातील सुचनांची कार्यवाही सर्व झोनमध्ये सुरु असल्याचे त्यांनी नमुद केले. तथापी पुन्हा या परीपत्रकाची प्रत झोन क्र. 1,2,4,7,8 यांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी महानगर पालिकेचे दि.13.12.2006 चे परीपत्रक झोन क्र. 1,2,4,7,8 यांना डाकबुकामधून पाठविल्याचे दिसून येत नाही असे स्पष्टपणे कळवावे तसेच या परीपत्रकाची प्रत आता पुन्हा या झोनकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असेही अपीलकर्ता यांना कळवावे.

2) तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिकेची प्रत उपलब्ध नाही असे देखील अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1783-1785

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 230 नाग/2011**

श्री तिलोकचंद सुगनचंद सिंघवी
मु. पो. मंगरुह
ता. समुद्रपूर जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
लघु सिंचन जिल्हा परिषद उपविभाग हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) श्री सी. एम. कोरडे
जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
लघु सिंचन जिल्हा परिषद उपविभाग हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता लघु सिंचन जिल्हा परिषद उपविभाग हिंगणघाट यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा मंगरुळ येथील पाणी साठवण तलावाबाबत झालेल्या कामाच्या खर्चाची व तलावाच्या कामाबाबतची 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 1 ते 5 मुद्यांवर माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या साठवण तलावाचे बांधकाम हे चांगले झालेले नाही तसेच त्या तलावाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले मटेरीअल चांगले वापरले नाही त्यामुळे त्या तलावात पाण्याचा साठा होत नाही म्हणून झालेले बांधकाम हे योग्य रितीने झालेले नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीला नंतरही त्यांना समाधानकारक माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता श्री कोरडे हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संकलीत करण्यात आली कारण माहिती पुरविण्याकरीता आवश्यक असणारी मोजमाप पुस्तीका जिल्हा परिषद विभाग वर्धा तसेच सिंचन विभाग वर्धा येथे देयकाचे भुगतान करण्याकरीता दिले असल्यामुळे त्यांच्या कडून माहिती संकलीत करुन घेतली आणि अपीलकर्त्याच्या 1 ते 5 मुद्यांवरची माहिती तयार करण्यात आली. या 5 मुद्यांच्या माहितीच्या एकूण 25 झेरॉक्स प्रती होत्या. त्याचे शुल्क आणि रजिस्टर पोस्टाने पाठविण्याचे शुल्क असे एकूण रु. 90/- माहितीचे शुल्क भरण्यासाठी अपीलकर्त्यास दि. 4.9.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीचे शुल्क

भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 27.9.2010 रोजी माहितीच्या एकूण झेरॉक्स प्रती 28 अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्या. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत दाखविली तसेच सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्यानेही सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की मौजा मंगरुळ येथे पाणी साठवण तलाव बांधलेले आहे त्या बांधकामासाठी वापरण्यात आलेले मटेरीअल निकृष्ट दर्जाचे आहे त्यामुळे त्या तलावामध्ये पाण्याचा साठवण होत नाही त्यामुळे तलावाच्या झालेल्या बांधकामाची गुणवत्ता चांगली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की तलावाचे बांधकाम प्लॅन व एस्टीमेट प्रमाणे झालेले आहे आणि अपीलकर्त्यास 1 ते 5 मुद्यांवरची माहिती त्यांनी माहितीचे शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 1 ते 5 मुद्यांवरची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्त्याचे तलावाच्या बांधकामाच्या गुणवत्ते बाबत आक्षेप आहे. तथापी तलावाच्या बांधकामाच्या गुणवत्तेची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1787-1788

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 229 नाग/2011**

श्री रमेश भिवराज भुतडा
C/o. हिंदुस्थान वस्त्रालय, मेन रोड वार्ड नं.6
मु. पो. सावनेर ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विनोद जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री वाडीकर
जन माहिती अधिकारी तथा कर संग्रहक
नगर परिषद सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कर संग्रहक नगर परिषद सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सेठ कन्हैयालाल गिरधारी माहेश्वरी यांचे स्वतःचे दुकान होते ते दुकान भाडयाने अपीलकर्त्याने घेतले होते आणि त्या दुकानात अपीलकर्त्याचे हिंदुस्थान वस्त्रालय हे दुकान होते म्हणून ते त्या दुकानाचा भोगवटदार असल्यामुळे त्याचा टॅक्स अपीलकर्ता भरत होते तथापी सन 2001 पासून नगर परिषदेच्या प्रॉपर्टी टॅक्सच्या नोंदवहीतून त्यांचे नाव कमी करण्यात आले त्याबाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलात नगर परिषदेच्या रेकॉर्डला जी माहिती उपलब्ध आहे ती अपीलार्थीला विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय देण्यात आला त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 रोजी माहिती प्राप्त झाली. मात्र अपीलकर्त्याचे नाव नगर परिषदेच्या प्रॉपर्टी टॅक्सच्या नोंदवहीतून सन 2001 पासून

कसे कमी करण्यात आले त्याची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कर संग्रहक श्री वाडीकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री विनोद जाधव हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा कर संग्रहक श्री वाडीकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. दि. 17.8.2009 चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कर आकारणीशी संबंधीत होती. म्हणून कर आकारणी सर्व्हेक्षणच्या वेळी तयार केलेली माहितीची यादी नगर रचना कार्यालय नागपूर येथे तपासणी करीता गेली असल्याकारणाने सद्यस्थितीत माहिती देता येणार नाही असे अपीलकर्त्यास दि. 8.6.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार दि. 3.2.2011 रोजी अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे माहिती पाठविण्यात आली.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी यांचेकडे दि. 10.12.2010 रोजी दाखल केले. त्याची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.1.2011 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की नगर परिषद रेकॉर्डला जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. आणि त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 च्या पत्राने पोस्टाद्वारे उपलब्ध असलेली माहिती पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे अपीलकर्त्यान सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे आणि त्यांचे नाव नगर परिषदेच्या प्रॉपर्टी टॅक्सच्या नोंदवहीतून सन 2001 पासून कसे कमी करण्यात आले आहे याची सविस्तर माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. आणि माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याबद्यल जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 17.8.2009 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच अपीलकर्ता यांचे नाव नगर परिषदेच्या प्रॉपर्टी टॅक्सच्या नोंदवहीतून सन 2001 पासून कसे कमी करण्यात आले आहे याची सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे नाव नगर परिषदेच्या प्रॉपर्टी टॅक्सच्या नोंदवहीतून सन 2001 पासून कसे कमी करण्यात आले आहे याची सविस्तर माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर दि. 8.6.2010 च्या पत्राने आणि दि. 3.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसते. म्हणून सदरची माहिती देण्यास विलंब झालेला आहे. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी सुनावणीत असे सांगितले की कर आकारणीची यादी नगर रचना कार्यालय नागपूर येथे तपासणी करीता गेली असल्याकारणाने अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती देता आली नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते आहे.
3) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही **मुख्याधिकारी नगर परिषद सावनेर** यांनी करावयाची आहे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1790-1792

जा.क्र.---------- दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 231 नाग/2011**

श्री मच्छींद्र जंगलूजी आवळे
42, कानफाडे नगर वर्धा रोड
नागपूर ता. जि. नागपूर –15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता(लोककर्म विभाग)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
महानगर पालिका धंतोली झोन नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर महानगर पालिका धंतोली झोन नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मनपा वार्ड क्र. 108 मधील कानफाडे नगर या वस्तीमधील रोडचे डांबरीकरण करण्या संदर्भात स्थायी समिती/आमदार फंड मधून माहे आक्टोबर ते डिसेंबर 2010 मध्ये मंजूर केलेल्या कामाबाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना 30 दिवसांच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी अधिक्षक अभियंता महानगर पालिका नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचा प्रथम अपीलाचा अर्ज घेण्यास नकार असा शेरा लिहून परत आला. म्हणून त्यांनी राज्य माहिती

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि त्यानंतर दि. 27.4.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांचेकडून विलंबाने त्यांना माहिती प्राप्त झाली म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता धंतोली झोन क्र.4 नागपूर श्री अनिल कडू हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री बनसोड कनिष्ठ लिपीक स्लम विभाग मनपा नागपूर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता श्री अनिल कडू यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 24.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही डी पी डी सी अंतर्गत कामाबाबत असून डी पी डी सी (दक्षिण पश्चीम नागपूर) चे काम लक्ष्मीनगर झोन करत असल्यामुळे त्यांचेकडून माहिती प्राप्त करण्यासाठी लक्ष्मीनगर झोनला दि. 20.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता लक्ष्मीनगर झोन क्र.1 यांना पत्र पाठविले. त्यानंतर उपअभियंता लक्ष्मीनगर झोन क्र.1 यांनी दि. 24.12.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता धंतोली झोन क्र.4 यांना असे कळविले की सदर प्रस्तावाची नस्ती अजूनपर्यंत आपले झोन कडून या कार्यालयाकडे पाठविण्यात आली नाही तसेच प्रस्ताव हा आपले झोन मार्फतच तयार करण्यात आल्यामुळे मागितलेली माहिती आपल्या झोन मार्फत देणे अपेक्षित आहे असे लक्ष्मीनगर झोन यांनी कळविले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 27.4.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र सदरची माहिती सुमारे 4 महिने 10 दिवस उशीराने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे नमुद केले.

5. प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे पोस्टाने पाठविल्याचे दिसते. परंतू प्रस्तूत प्रकरणी कार्यकारी अभियंता हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. परंतू कार्यकारी अभियंता यांचेकडे कोणतेही प्रथम अपील दाखल झालेले नाही असे श्री बनसोड यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपील अधिक्षक अभियंता यांचेकडे दाखल केल्याचे दिसून येते त्यामुळे ते पोस्टाने refuse म्हणून परत आल्याचे दिसून येते.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 21.12.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 24.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसांच्या मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 27.4.2011 च्या पत्राने म्हणजे सुमारे 4 महिने उशीराने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याबाबत जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की कामाच्या निविदेची धारीका ही मुख्यालयात निविदेच्या प्रक्रियेत सादर झालेली होती तसेच अपीलकर्त्यास लक्ष्मीनगर झोन कडून माहिती पाठविण्यात येईल अशी त्यांची अपेक्षा होती तथापी लक्ष्मीनगर झोन कडून अपीलकर्त्यास माहिती पाठविली नाही असे दिसून आल्यानंतर त्यांनी दि. 27.4.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे त्यांनी नमुद केले. मात्र विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता धंतोली झोन क्र.4 यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता धंतोली झोन क्र.4 यांनी अपीलकर्त्याच्या दि. 21.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 27.4.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास सुमारे 4 महिने 10 दिवस उशीराने उपलब्ध करुन दिलेली आहे. विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता धंतोली झोन क्र.4 यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 15000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या शास्तीची वसुली आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी करावयाची आहे. त्यासाठी या निर्णयाची एक प्रत **आयुक्त महानगर पालिका नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1794-1797

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 228 नाग/2011**

श्री डॉ. भास्कर रामराव काटे
71, विद्या विहार प्रतापनगर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक(प्रशासन)
संचालनालय, लेखा व कोषागरे, मुंबई
नविन शासकीय कुटीर नं.15 व 16, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई 21
2) जन माहिती अधिकारी
संचालनालय, लेखा व कोषागरे, मुंबई
नविन शासकीय कुटीर नं.15 व 16, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
मुंबई 21 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपीलकर्त्याने दि. 22.9.2010 रोजी संचालनालयास सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली त्याची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी उपसंचालक संचालनालय, लेखा व कोषागरे, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील निकाली काढल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्रीमती शेंडे सहा.संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री कोहळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्रीमती शेंडे आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री कोहळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 8.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने संचालनालयास दि. 22.9.2010 रोजी केलेल्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल मागितलेला होता. त्याबाबत असे दिसून येते की अपीलकर्ता डॉ. काटे सेवानिवृत्त संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन या पदावरुन दि. 30.11.1989 रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचे संचालक या पदावरील दि. 1.1.1986 रोजीचे वेतन रु. 5400–150–6300–200–6500 या वेतनश्रेणी मध्ये रु. 6300 वेतन पडताळणी पथक मुंबई यांनी प्रमाणीत केले आहे. परंतू डॉ. काटे यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या सेवापुस्तकामध्ये संचालक या पदावरील रु. 4500–7300 या वेतनश्रेणीमध्ये दि. 1.1.1986 रोजी रु. 5700 असे वेतन पडताळणी पथकाकडून प्रमाणीत झालेली असून चुकीचे वेतन पडताळणी

करणा—या लेखाधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी अशी त्यांची मागणी आहे. तथापी अपीलकर्ता डॉ. काटे यांच्या म्हणण्या पुष्टयर्थ त्यांनी सादर केलेल्या वेतन पडताळणी प्रमाणपत्राची प्रत ही त्यांच्याच सेवापुस्तकात आहे किंवा कसे याबाबत त्यांच्या विभागाकडे म्हणजे संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडे खात्री करण्याबाबत कळविले होते कारण अपीलकर्त्याचे सेवापुस्तक संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडे होते. परंतू अपीलकर्ता यांनी तसे न करता संबंधीत लेखाधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्याबाबत आग्रह धरत आहेत. म्हणून संचालनालयाच्या दि. 13.7.2010 चे व दि. 6.9.2010 चे पत्रातील सुचनांनुसार त्यांनी कार्यवाही केली नसल्याने त्यांचे दि. 22.9.2010 चे पत्रावर कार्यवाही केलेली नाही ही बाब अपीलकर्ता डॉ. काटे यांना दि. 25.11.2010 च्या पत्राने कळविलेले आहे असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की डॉ. काटे यांनी याबाबत संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेकडे उपलब्ध असलेल्या त्यांच्या सेवापुस्तकातील वेतन पडताळणीच्या नोंदणीबाबत खात्री करुन घेणे संयुक्तीक होईल. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 25.11. 2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1799-1800

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 150 नाग/2011, अपील क्रमांक 151 नाग/2011 व अपील क्रमांक 152 नाग/2011**

श्री पुरुषोत्तम उमाजी ठाकरे
मे. ठाकरे मेटल्स, कासार ओळी, इतवारी, नागपूर
ता. जि. नागपूर –440002 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रदीप गोहके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(नगर रचना विभाग)
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 440032

2) श्री प्रविण गोहील
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,(नवि–9)
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 440032 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2011 रोजी अपील क्रमांक 150 नाग/2011, आणि दिनांक 21.1.2011 रोजी अपील क्रमांक 151 नाग/2011 आणि अपील क्रमांक 152 नाग/2011 असे तीन द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. वरील तीन्ही अपीलांमध्ये अपीलकर्ता हे एकच आहेत. तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे तीन्ही अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. तसेच जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी,(नवि–9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई हे उपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने देखील जन माहिती अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

2. **<u>अपील क्रमांक 150 नाग/2011</u> –** आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर

शहरातील गावठाण क्षेत्रातील चटई क्षेत्र निर्देशंकाबाबत शासन निर्णय 17 जुलै 2010 च्या अनुषंगाने माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 25.10.2010 च्या पत्राने असे कळविले की माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अभिलेख स्वरुपात असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. आपण मागितलेली माहिती स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे ती आपणास उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र संबंधित नस्तीची संपूर्ण छायाप्रत आपणास हवी असल्यास आपणास त्यासाठी माहितीचे शुल्क रु. 605/– भरणा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की नगर विकास विभागाने नागपूर गावठाणात दाटीवाटीच्या क्षेत्रात कमी क्षेत्राचा भूखंड मंजूर करण्यामागची नगर विकास विभागाच्या भूमीकेची व त्यामागील कारणांची सविस्तर माहिती मागितलेली आहे. तसेच नियम क्र. एन.1.1.2 मध्ये भूखंड वापरा ऐवजी 1000 चौ. मि. क्षेत्र दाखविण्या मागे नगर विकास विभागाचा उद्येश काय आहे याची माहिती त्यांनी मागितलेली होती. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे कागदपत्राच्या स्वरुपात कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल.

3. **अपील क्रमांक 151 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,(नवि–9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर शहरातील गावठाण क्षेत्रातील चटई क्षेत्र निर्देशंकाबाबत शासन निर्णय 17 जुलै 2010 या विषयाच्या अनुषंगाने माहिती मागितलेली होती. त्यामध्ये अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की विषयांकीत प्रकरणी सादर केलेल्या टिपणीत नगर विकास विभागाचे दि. 18.2.2010 चे अभिप्रायात श्री पाटील सहा. नगर रचनाकार यांनी असे नमुद केले की नागपूर महानगर पालीकेने शासनाने नियोजनाच्या दृष्टीने दि. 19.4.2006 रोजी दिलेल्या निर्देशाचा सारासार विचार न करता प्रस्तूत फेरबदल सादर केला आहे. त्याबाबत शासनाच्या नियोजन दृष्टीची माहिती मागितलेली आहे. तसेच नागपूर गावठाणात सरसकट 2.0 चटई क्षेत्र शासन नियोजनाच्या दृष्टीनी अमान्य केला याबाबतची माहिती मागितलेली होती. तसेच या फेरबदलास मंजूरी देतांना नगर विकास मंत्रालयाच्या कार्यप्रणाली कोणती आहे त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती.

4. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 25.10.2010 च्या पत्राने असे कळविले की मागितलेली माहिती स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे ती आपणास

उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र संबंधित नस्तीची संपूर्ण छायाप्रत आपणास हवी असल्यास आपणास त्यासाठी माहितीचे शुल्क रु. 605/– भरणा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिति अधिकारी यांनी कळविले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 25.10.2010 च्या पत्राने कळविलेली कार्यवाही योग्य असल्याचे ठरवून प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की त्यांना संपूर्ण नस्तीच्या कागदपत्राची आवश्यकता नाही. मात्र त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यालयान टिपणीच्या मध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयाची कारणमिमांसा आहे त्याच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

6. **<u>अपील कमांक 152 नाग/2011</u>** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,(नवि–9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर शहरातील गावठाण क्षेत्रातील चटई क्षेत्र निर्देशंकाबाबत शासन निर्णय 17 जुलै 2010 या विषयाच्या अनुषंगाने माहिती मागितलेली होती. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रात कोणत्याही नगर पालीकेत भूखंडाचा चटई क्षेत्र निर्देशंक रस्ता रुंदीकरणाच्या आकारमानावर ठरवला जात नाही. परंतू नागपूर गावठाणासाठी एफ.एस.आय. रस्त्याच्या रुंदीवर ठरविणारा वेगळा नियम करण्या मागच्या प्रयोजनाची माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याच्या दि. 17.10.2010 च्या माहितीच्या अर्जावर रु. 10 कोर्ट फी स्टॅम्प नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 27.10.2010 च्या पत्राने माहितीच्या अर्जावर रु. 10 कोर्ट फी स्टॅम्प लावण्याबाबत नवीन अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केला आणि त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक व स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे ती आपणास उपलब्ध करुन देता येत नाही. तथापी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण नस्तीची छायाप्रत आपणास हवी असल्यास आपणास त्यासाठी माहितीचे शुल्क रु. 605/– भरणा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील आवश्यक तेवढेच त्यांना कागदपत्रे हवी आहेत. संपूर्ण धारीकेच्या कागदपत्रांची त्यांना आवश्यकता नाही.

6. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही अभिप्रायात्मक व स्पष्टीकरणात्मक आहे तथापी शासन निर्णय निर्गमीत

केलेले आहे. त्या शासन निर्णयात सर्व कारणमिमांसा केलेली आहे. म्हणून त्या शासन निर्णया व्यतिरीक्त इतर स्पष्टीकरण किंवा अभिप्राय देणे अपेक्षित नाही.

7. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 च्या पत्राने दिलेली माहिती योग्य ठरवून प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

8. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अधिकाराच्या अर्जात नमुद केलेल्या माहितीचा समावेश शासन निर्णय दि. 17.7.2010 मध्ये नमुद आहे. म्हणून त्याबाबत पुन्हा वेगळे स्पष्टीकरण किंवा अभिप्राय देणे अपेक्षित नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 17.7.2010 च्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व योग्य होईल. म्हणून खालील प्रमाणे आदेश.

## आ दे श

1) **अपील क्रमांक 150 नाग/2011** – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने मागितलेली मुद्दा क्र. 1 व 2 ची माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत कळवावे.

2) **अपील क्रमांक 151 नाग/2011** – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावे.

3) **<u>अपील क्रमांक 152 नाग/2011</u>** – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 17.7.2010 च्या शासन निर्णयाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1801-1805

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 236 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप,
नागपूर ता. जि. नागपूर –440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री उमरेडकर
जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन हिंगणा तालुक्यातील सर्व प्राथमिक व माधमिक शाळेचे शिक्षकांच्या संदर्भात त्यांना दिल्या जाणा–या घरभाडेच्या संदर्भात तसेच शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी, केंद्र प्रमुख व इतर अधिका–यांच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगणा श्री उमरेडकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री नैताम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.10.2010 चा माहितीचा अर्ज त्याच्या कार्यालयाकडे दि. 13.10. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपात असल्यामुळे संकलीत करण्यास कालावधी लागेल म्हणून अपीलकर्त्यास दि. 26.10.2010 च्या पत्राने कळविले की सदरची माहिती संकलीत करण्यास सुमारे 2 महिन्याचा कालावधी लागेल. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपात असल्यामुळे माहिती संकलीत करण्याची कार्यवाही सुरु असतांना अपीलकर्त्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र सदरचे प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांनी खंड विकास अधिकारी हिंगणा यांचेकडे सुनावणीसाठी पाठविले. याबाबत अपीलकर्त्याने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की गटशिक्षणाधिकारी यांच्या निर्णयावर प्रथम अपील हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल करण्याची तरतूद आहे. कारण गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अपील हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांचे नाव नमुद केलेले आहे. अशा परीस्थितीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांनीच या प्रथम अपीलाची सुनावणी घेणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. गटशिक्षणाधिकारी यांच्या निर्णया विरुध्द प्रथम अपीलाची तरतूद ही शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांचेकडे असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी देखील आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

5. अपीलकर्ता तसेच गटशिक्षणाधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की गटशिक्षणाधिकारी यांच्या निर्णया विरुध्द प्रथम अपील हे शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे असल्यामुळे त्यांनीच सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे अपेक्षित आहे. मात्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांनी सदरचे प्रथम अपील खंड विकास अधिकारी हिंगणा यांचेकडे सुनावणीसाठी पाठविल्याचे आयोगापुढे सांगितले. मात्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) यांची ही कृती योग्य दिसून येत नाही. कारण गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातील बोर्डावर प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचे नाव दर्शविलेले असल्यामुळे अपीलकर्त्याने प्रथम अपील त्यांचेकडे दाखल केलेले आहे. म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी 15 दिवसात सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे संयुक्तीक होईल. म्हणून सदरचे अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे परत निर्णयासाठी पाठविण्यात येत आहे.

## आ दे श

1) शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी प्रथम अपीलाची सुनावणी 15 दिवसात घेवून प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत करावा. अन्यथा त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1807-1809

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 463/2010

श्री सुधाकर बागडे पत्रकार
रा. बस स्थानक मागे, हाऊसिंग बोड कॉलनी,
सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत नांदा गोमुख
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 23.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत नांदा गोमुख ता. सावनेर हे सुनावणीस गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत नांदा गोमुख ता. सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दारीद्रय रेषेखाीली येणा–या नांदा गोमुख येथील कुटुंबांची माहिती/यादी 1 ऑक्टोबर 2010 ते 30 ऑक्टोबर 2010 या कालावधीची माहिती मागितलेली होती. तसेच या कालावधीतील व्हीजीट बुकच्या झेरॉक्स प्रती व शासनाच्या परीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. तथापी त्यांना माहिती मिळाली झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. तक्रारदार यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माहिती मागितलेली आहे. तथापी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. कारण प्रस्तूत प्रकरणी तक्रारदार यांनी ग्राम पातळीवरील माहिती मागितलेली दिसते. त्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे योग्य व संयुक्तीक आहे. म्हणून याबाबत

तक्रारदार यांनी देखील प्रथम अपील दाखल करण्याचे आयोगासमोर मान्य केले. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय तक्रारदार यांना मान्य नसल्यास आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याची मुभा त्यांना राहिल. म्हणून तक्रारदार यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल करावे म्हणून तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येते.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **खंड विकास अधिकारी सावनेर ता. सावनेर जि. नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

3) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1811-1812

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 244 नाग/2011**

श्री भिमराव श्रावण शेंडे
श्री विजय शालीकराम खोब्रागडे
149, बजरंग नगर, गल्ली नं. 2, मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर –27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एम. गाडगे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख लेखा व वित्त अधिकारी,
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री वाय. जे. जांभूळकर
जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी,
वित्त विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, वित्त विभाग, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अग्निशामक विभागातील कर्मचा–याचे वेतन विसंगतीच्या नस्ती बाबत माहिती मागितलेली होती. त्यामध्ये प्रामुख्याने वित्त व लेखा विभागाचा आदेश क्रमांक 174/सीए ॲन्ड एफओ दि. 16.10.1996 चा आदेश व संपूर्ण नस्तीची साक्षांकीत प्रत तसेच वित्त व लेखा विभागाचा आदेश क्रमांक 88/सीए ॲन्ड एफओ दि. 20.7.1996 चा आदेश व संपूर्ण नस्तीची कागदपत्रे अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.12.200 रोजी देण्यात आला त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध 15

दिवसात घेवून अपीलार्थींना नस्तीतील कागदपत्राच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, वित्त विभाग श्री जांभूळकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रमुख लेखा व वित्त अधिकारी श्री गाडगे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध व्हावी म्हणून त्यांनी दि. 5.10.2010 रोजी महानगर पालिकेच्या अग्निशामक विभाग तसेच सामान्य प्रशासन विभाग तसेच सिव्हील कोर्ट एजंट विभाग यांना पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून माहिती मागितली. मात्र त्या विभागाकडून जन माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले की सदरच्या माहितीची नस्ती त्यांच्या विभागाकडे नसून वित्त विभागाकडे ती नस्ती आहे असे त्यांनी वित्त विभागाला कळविले. त्यानंतर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी वित्त विभागाच्या संबंधीत लिपीकाकडे या नस्तीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना कळविले. तथापी संबंधीत लिपीकाने देखील सदरची नस्ती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले. त्यानंतर आस्थापना विभागाने दि. 19.11.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, वित्त विभाग यांना असे कळविले की संदर्भीत नस्तीचा आस्थापना विभागात शोध घेण्यात आला असता ही नस्ती आस्थापना विभागाद्वारे डाक बूकातून दि. 3.8.2002 रोजी आपल्या विभागात पाठविण्यात आली आहे आणि त्याचा पुरावा म्हणून त्यांनी डाक बूकाच्या पानाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविल्याचे दिसून येते. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्ती ही वित्त विभाग यांचेकडे पाठविल्याचे आस्थापना विभागाच्या दि. 19.11.2010 च्या पत्रावरुन स्पष्ट होते आणि सदरची नस्ती वित्त विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्या विभागाकडेच ही नस्ती उपलब्ध होणे आवश्यक आहे. तथापी सदरच्या नस्तीचा शोध घेवून नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी श्री घाडगे यांनी आयोगपुढे असे सांगितले की प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या नस्तीचा 15 दिवसात शोध घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिलेला आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्ती वित्त विभागाकडे आस्थापना विभागाकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणून जन माहिती अधिकारी वित्त विभाग यांनी पुन्हा सदरच्या नस्तीचा

कसून शोध घ्यावा आणि नस्ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. मात्र सदरच्या नस्तीचा पुन्हा शोध घेवून नस्ती उपलब्ध न झाल्यास त्यास जबाबदार असणा–या कर्मचा–यावर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी आणि त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती प्रमाणे कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या नस्तीचा कसून शोध घ्यावा आणि नस्ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. मात्र नस्ती उपलब्ध न झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कर्मचा–यावर निश्चित करावी आणि त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवा शर्ती प्रमाणे योग्य ती कार्यवाही सक्षम अधिका–याकडे प्रस्तावीत करावी आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना 15 दिवसाचे आंत कळवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1814-1816

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 246 नाग/2011

श्री सुधाकर लक्ष्मणराव होकम
महेशनगर होमगार्ड ग्राऊंडला लागून,
तुकूम वार्ड नं.3, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. ए. मित्रा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी,(मुख्यालय व नियोजन)
वनसंरक्षक कार्यालय चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर
सिव्हील लाईन, नागपूर रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर 442401
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
वनसंरक्षक कार्यालय चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर
सिव्हील लाईन, नागपूर रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर 442401 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक वनसंरक्षक कार्यालय चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन संगणक चाचणी परीक्षेच्या संदर्भात 1 ते 12 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती मिळाली झाली नाही. मात्र दि. 30.10.2010 च्या पत्राने आणि दि. 17.1.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार कायद्यान्वये कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक यांच्या वतीने श्री एम.व्ही.देशेट्टवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी श्री मित्रा हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले श्री एम.व्ही.देशेट्टवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.10.2009 चा माहितीचा अर्ज त्याच्या कार्यालयाकडे दि. 12.10.2009 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.10.2010 च्या पत्राने आणि दि. 17.1.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती उपलब्ध होण्यास विलंब का लागला याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले श्री एम.व्ही. देशेट्टवार यांनी आयोगा पुढे कोणताही खुलासा केला नाही.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय वन अधिकारी वनसंरक्षक कार्यालय चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.12.2010 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी माहिती वेळेच्या आत उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात. तथापी अपीलकर्ता यांना 15 दिवसाच्या आत विनामुल्य माहिती पुरविण्याबाबत त्यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केले असे प्रथम अपीलीय अधिकारी श्री मित्रा यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसते म्हणजे सदरची माहिती सुमारे 1 वर्ष 18 दिवसाच्या विलंबाने दिलेली दिसते. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर काही माहिती दि. 17.1.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणजे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून 1 वर्षा पेक्षा जास्त कालावधीच्या विलंबाने माहिती पुरविल्याचे दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले श्री एम.व्ही. देशेट्टवार आणि प्रथम अपीलीय अधिकारी श्री मित्रा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे 1 वर्षा पेक्षा जास्त कालावधीच्या विलंबाने माहिती पुरविल्याचे दिसून येते. सदरची माहिती पुरविण्यास का विलंब झाला या संदर्भात आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित नसल्यामुळे त्याचा खुलासा होवू शकला नाही. म्हणून माहिती देण्यास विलंब झाल्याबद्यल जन माहिती अधिकारी हे दोष आढळून येतात.

म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 20000/– ची शास्तीची कार्यवाही त्यांचेवर का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे करणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे सुमारे 1 वर्षा पेक्षा जास्त कालावधीच्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 20000/– ची शास्तीची कार्यवाही त्यांचेवर का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा सदरची कार्यवाही कायम करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1811-1813

जा.क्र.–––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 245 नाग/2011**

श्री राजा खान महेबुब खान
सुमित अपार्टमेंट, शनिवारी, कॉटन मार्केट
1 ला माहा, सुभाष रोड नागपूर –18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ, नागपूर 440012
2) श्री अलोणी
जन माहिती अधिकारी
विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड,
रामदास पेठ, नागपूर 440012 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माहे सप्टेंबर 2010 आणि ऑक्टोबर 2010 या कालावधीत उद्योजकांना आणि विट भट्टीधारकांना केलेल्या कोळशाच्या वाटपाबाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्रापत झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय व्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. आणि विभागीय व्यवस्थापकानी त्यांचे प्रथम अपील मंजूर करुन 30 दिवसाचे मुदतीत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी त्यांना संपूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर श्री अलोणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने जन माहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 21.12.2010 रोंजी रजिस्टर पोस्टाने पत्र पाठवून असे कळविले की सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता उद्योजकांची पूर्व परवानगी घेण्याकरीता येणारा अंदाजे रु. 550/– माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय व्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती दि. 20.2.2010 च्या पत्राने विनामुल्य पुरविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र त्यांना मनी रीसीटच्या प्रती त्या माहिती मध्ये दिलेल्या नाहीत असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 13.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचे शुल्क रु. 550/- भरण्याबाबत कळविले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. मात्र त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 20.2.2010 च्या पत्राने विनामुल्य माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मनी रीसीटच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाही म्हणून मनी रीसीटच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मनी रीसीटच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1821-1822

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 247 नाग/2011**

श्री गोविंदा भिका नाकतोडे
नवेगावबांध(मुक्ता)
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. वा. मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर
2) श्रीमती व्ही. एच. सोनवणे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कोथुळना(मुक्ता)
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कोथुळना(मुक्ता) ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन इंदिरा आवास योजनेत श्री हरी नाकतोडे यांना घरकुल मंजुर केले त्याबाबत 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 14.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्रीमती व्ही. एच. सोनवणे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी श्री मडावी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्रीमती व्ही. एच. सोनवणे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली 1 ते 5 मुद्यांची माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 14.12.2010 च्या पत्राने पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना घर नं. 100 ची ग्रामपंचायत कर भरण्याची पावती त्यांना मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी

असे सांगितले की घर नं. 100 हा सन 2007–2008पर्यंत श्री हरीभाऊ गोंविंदा भिका नाकतोडे यांची मालकी होती सन 2008–2009 ते 2011–2012 या वर्षात झालेल्या ग्रामपंचायत कर आकारणी नुसार ही मालमत्ता ग्रामपंचायत रेकॉर्डवर घर क्र. 89 वर असून श्री हरीभाऊ गोंविंदा भिका नाकतोडे यांची मालकी हक्क आहे. मात्र घर क्र. 89 चा घर टॅक्स भरणा झालेला नाही. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्री हरीभाऊ गोंविंदा भिका नाकतोडे यांना घरकुल योजनेत घर मंजुर केल्याची कार्यवाही योग्य नाही तथापी त्यावर जन माहिती अधिकारी आणि संवर्ग विकास अधिकारी यांनी असे सांगितले की श्री हरीभाऊ गोंविंदा भिका नाकतोडे यांना घरकुल योजनेच्या निकषाप्रमाणे घरकुल मंजुर झालेले आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकत्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 14. 12.2010 च्या पत्रान्वये 1 ते 5 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी मुद्या क्र. 5 मधील घर नं. 100 या घराचा आता नवीन मोजणीत घर क्र. 89 झालेला असल्यामुळे आणि घर क्र. 89 चा टॅक्स भरणा केलेला नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी घर क्र. 89 चा टॅक्स भरणा केलेला नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1824-1825

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 275 नाग/2011**

श्री धनराज किसनजी झाडे
मु. पो. महादुला(पंचाळा)
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. के. बालपांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)
बं.क्र.39/1, सिव्हील लाईन नागपूर
2) श्री संजय इंदुरकर
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उपविभाग रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महादूला चिपाडा घोटीटाक रोडचे डांबरीकरणास आणि सी.डी.वर्कच्या काढलेल्या टेंडरची सत्यप्रत तसेच सदरचे काम कोणत्या कंत्राटदारास दिले त्यांचे नाव व पूर्ण पत्ता इत्यादी बाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 17.12.2009 रोजी माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की सन 2007 ते 2009 या कालावधीत महादूला चिपाडा घोटीटाक रोडचे डांबरीकरण व सी.डी.वर्क या नावाने कुठलेही काम झाले नाही

अथवा निविदा काढण्यात आलेल्या नाही. त्यामुळे संबंधीत दस्तऐवज पुरविता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी या दिलेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) सिव्हील लाईन नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग रामटेक श्री इंदुरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री डी. के. बालपांडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग रामटेक श्री इंदुरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री डी. के. बालपांडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.11.2009 चा माहितीचा अर्ज दि. 18.11.2009 रोजी उपविभागीय अभियंता यांच्याकडे प्राप्त झाला होता. मात्र प्रस्तूत प्रकरणी त्यावेळेला जन माहिती अधिकारी हे कार्यकारी अभियंता असल्यामुळे त्यांनी दि. 21.11.2009 च्या पत्राने सदरच्या माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर यांच्याकडे हस्तांतर केला. सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्राप्त झाला. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती बाबत खात्री करण्यात आली आणि त्यानंतर असे दिसून आले की अपीलकर्त्याने माहिती अर्जात नमुद केलेला महादूला चिपाडा घोटीटाक रोडचे सन 2007 ते 2009 या कालावधीत डांबरीकरण झालेले नाही त्यामुळे सी.डी.वर्क च्या संबंधात काढलेल्या टेंडरची आणि इतर माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणार नाही ही बाब अपीलकर्त्यास दि. 17.12.2009 च्या पत्राने कळविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगा समोर सुनावणीत नमुद केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की महादूला चिपाडा घोटीटाक रोडचे डांबरीकरण झालेले आहे. त्यावर कार्यकारी अभियंता यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की त्यांनी मागितलेल्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले नाही. मात्र महादूला पांचाळा या रोडचे डांबरीकरण झालेले आहे. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास त्यांनी उपलब्ध करुन देण्याचे आयोगापुढे मान्य केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की महादूला चिपाडा घोटीटाक रोडचे सन 2007 ते 2009 या कालावधीत डांबरीकरण झालेले नाही. मात्र महादूला पांचाळा या रोडचे या कालावधीत डांबरीकरण झालेले आहे. म्हणून त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना महादूला पांचाळा या रोडच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1827-1829

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 274 नाग/2011**

श्री अजय राममोहन तिवारी
रा.276, माहूले यांचे घरा मागे, संत्राा मार्केट रोड,
लोधीपुरा, नागपूर
ता. जि. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी(महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री हरदास
जन माहिती अधिकारी तथा नझूल तहसिलदार
नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.5.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नझूल तहसिलदार नागपूर श्री हरदास हे हजर होते.

3. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अपीलकर्त्याने अर्जात जरीपटका भागातील अतिक्रमणा संबंधात रा.मा.क्र.13 एलईएन 39/89–90 तसेच रा.मा.क्र.25 एलईएन 39/99–2000 आणि रा.मा.क्र. 65 एलईएन 39/99–2000 इत्यादी बाबत 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 89–90 आणि सन 99–2000 या कालावधीतील म्हणजे सुमारे 20 वर्षापूर्वीची आणि 11 वर्षापूर्वीची असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 30.8.2010 च्या पत्राने कळविण्यात आले की आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. सदर प्रकरण मिळताच आपणास माहिती पुरविण्यात येईल त्यानुसार अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखागार आणि संबंधित लिपीक यांना पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. तथापी अभिलेखागार आणि संबंधित लिपीक यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.9.2010 च्या पत्राने आणि दि. 20.10.2010 च्या पत्राने असे कळविले की अपीलकर्त्याने मागितलेल्या तीन्ही राजस्व प्रकरणांची नोंद संगणकात उपलब्ध नाही त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध झालेली नाही असे कळविले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 20.9.2010 च्या पत्रामध्ये 1,2 आणि 3 ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविले. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या मुद्या क्र. 4 ची माहिती

ही सहकारी गृह निर्माण संस्थेशी संबंधीत असल्यामुळे उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडून माहिती प्राप्त करण्याचे कळविले. मुद्या क्र. 5 बाबत अतिक्रमीत जागेसंबंधी मागणी अथवा अर्ज केलेला नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच मुद्या क्र.6 आणि 7 ची माहिती सहा. नगर रचनाकार महानगर पालिका नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे आपला अर्ज पत्रासह त्यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे असे कळविले. आणि मुद्या क्र. 8 ची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही असे देखील अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपजिल्हाधिकारी(महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 19.11.200 रोजी दिला आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी जी प्रकरणे कार्यालयात उपलब्ध नाही त्या प्रकरणा बाबत माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी कळवावे.

4. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुन्हा दि. 22.11.2010 च्या पत्राने असे कळविले की राजस्व मामला प्रकरणात मागितलेल्या माहितीचा शोध घेतला असता सदरचे तीन्ही प्रकरण त्या कार्यालयात उपलब्ध नाही.

5. जन माहिती अधिकारीयांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 30.8.2010 च्या पत्राने आणि त्यानंतर दि. 20.9.2010 च्या पत्राने आणि दि. 22.11.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1831-1832

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 273 नाग/2011

श्री राधेश्याम परसरामजी काबरा
शिवाजी वार्ड मु. पो. ता. देसाईगंज(वडसा)
जि. गडचिरोली –441207 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.5.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 28.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांच्या वतीने तहसिलदार श्री गोहणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांच्या वतीने नायब तहसिलदार श्री साखरकर हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री गोहणे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 16.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने दि. 29.6.2010 रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देसाईगंज यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेला दिनांक 29.6.2010 चा तक्रार अर्ज चौकशी साठी त्यांचेकडे पाठविला होता. तथापी तालुका निरीक्षक भूमी

अभिलेख देसाईगंज यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.8.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देसाईगंज यांचा चौकशी अहवाल अप्राप्त आहे. तो चौकशी अहवाल प्राप्त होताच आपण माहिती देण्यात येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांनी कळविल्याचे श्री गोहणे तहसिलदार यांनी आयोगापुढे सांगितले.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दि. 13.10.2010 रोजी अपर जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 4.11.200 रोजी घेण्यात आली त्यामध्ये अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेवून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 8.11.2010 चा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. आणि या प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांनी अपीलकर्त्याच्या दि. 29.6.2010 च्या तक्रार अर्जावर चौकशी पूर्ण झाली असल्यास चौकशीचे सर्व कागदपत्र तसेच अपीलकर्त्याचे दि. 16.8.2010 च्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 1 ते 13 ची उपलब्ध असलेली माहिती 7 दिवसात पुरविण्यात यावी. तसेच त्यांना आवश्यक असलेले दस्तऐवज तपासणीसाठी त्वरीत त्याच्या प्रती अर्जदारास विनामुल्य पुरविण्यात यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 12.1.2011 च्या पत्राने माहिती अर्जातील मुद्या क्र. 1 ते 13 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. वास्तविक पाहता अपीलकर्त्याने मागितलेल्या 1 ते 13 ची मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीतच देणे अपेक्षित होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि. 12.1.2011 च्या पत्राने 1 ते 13 ची मुद्यांची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. या विलंबास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/– शास्तीची कार्यवाही का करु नये याचा खुलासा त्यांनी आयोगापुढे करणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 12.1.2011 च्या पत्राने कळविलेल्या माहिती मध्ये मुद्या क्र. 8,10,11,12 ची माहिती निरंक आहे असे कळविलेले आहे. त्या ऐवजी या मुद्या बाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत वर नमुद केलेल्या निरंक माहिती ऐवजी त्या मुद्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावी.

2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/— शास्तीची कार्यवाही का करु नये याबाबचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) या निर्णयाची एक प्रत श्री गोहणे तहसिलदार देसाईगंज यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देसाईगंज यांचेकडे पाठवून त्यांनी आयोगाकडे खुलासा सादर करण्यास कळवावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1834-1836

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**